e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024
SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Journal for all Subjects
Research Article / Survey Paper / Case Study
Published By: SK Publisher
(www.skpublisher.com)
*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*
Special Issue: National Interdisciplinary Conference on "Women Empowerment: Issues, Challenges and Solutions"
Organised by: Department of Political Science & I. Q. A. C., Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.
(Sponsored by PM-UShA Grants to Strengthen Colleges)

# भारतीय संविधान व महिलांचे मानवाधिकार

**प्रा. डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड**
पदवी व पदव्यूतर राज्यशास्त्र विभाग,
सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला
**DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.v11i12.110**

मानवाधिकार मानवी जीवनासाठी विशेषत: सभ्य मानवी जीवनासाठी अत्यावश्यक आहेत. प्रत्येक मानवाला प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्याबरोबरच 'अन्न, वस्त्र व निवारा' ह्या मूलभूत गरजा पूर्ण होण्याच्या दृष्टीने सुध्दा त्याची आवश्यकता आहे. जीवन जगण्यासाठी मानवाचे दोन भाग स्त्री व पुरूष यांच्यात परस्पर सहकार्य आणि समानतेच्या आधारावर कौटुंबिक जीवन चालणे आवश्यक आहे. परंतु पुरूषप्रधान व्यवस्थेत महिलांची स्थिती दुय्यम दर्जाची बनली आहे. तिला कुटुंबात आणि समाजात वेगवेगळ्या परिस्थितीत अनावश्यकपणे विविध प्रकारचा त्रास दिला जातो. स्त्री—पुरूष समाजाचे दोन महत्वपूर्ण भाग आहेत. यापैकी स्त्रियांबरोबर भेदभाव व असमानतापूर्वक व्यवहार केला जातो तोच महिलांच्या मानवाधिकारांचा मुख्य आधार, जनक आहे.

प्रसिध्द फ्रेंच तत्वज्ञ व लेखक जीन जॅक्स रूसोच्या मते, 'मनुष्य स्वतंत्रपणे जन्मला आहे, परंतु तो प्रत्येक ठिकाणी बंधनात अडकला आहे'. रूसोच्या मते, मानव हा 'शोषण' आणि 'असमानतेच्या' बंधनात अडकला आहे. त्यातून मानवाला सोडवणे आवश्यक आहे.[१] महिला वेगवेगळ्या प्रकारच्या शोषण आणि असमानतेच्या बंधनात गुंतलेल्या आहेत. त्यांना त्यातून सोडवणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांचा विकास होऊ शकत नाही.

महिला समाजाच्या अविभाज्य घटक आहेत. प्राचीन काळापासून महिलांचे समाजात सर्वोच्च स्थान राहिले आहे. त्यांना सुख आणि समृध्दीचे प्रतिक मानले जात असते. परंतु मागील काही वर्षात महिलांच्या मानवाधिकाराचे हनन जितक्या प्रमाणात होत आहे. तितके यापूर्वी कधीच झालेले नव्हते.

मानव अधिकार अशा प्रकारचे मानवाधिकार आहेत, ज्यांचे सर्वजन हक्कदार आहेत. मग त्याचा देश, धर्म, जात, वंश कोणताही असो. परंतू संपूर्ण जगात कुठे ना कुठे तरी, कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मानवाधिकाराचे हनन होतांना दिसते. प्रत्येक कमकुवत वर्ग याचा शिकार होतांना दिसतो. महिलांचा यात समावेश होतो. भारतीय महिला हा एक असा मानवी समूह आहे जो मानवी अधिकाराच्या हननाशी अत्याधिक परिचित आहे.

**महिलांच्या मानवाधिकारासंबंधी भारतीय संविधानातील कायदेशीर तरतुदी:—**

भारतीय संविधान स्त्री—पुरूष यांच्यात कोणत्याही प्रकारचा भेदभाव करत नाही. संविधानाच्या दृष्टीने स्त्री—पुरूष समान आहेत तशाच प्रकारे महिलांच्या हितासांठी निर्माण करण्यात आलेल्या कायद्यांनी सुध्दा त्यांना पुरूषांच्या बरोबरीने दर्जा प्राप्त झाला आहे. महिलांच्या हक्कासाठी हुंडा प्रतिबंधक कायदा, पालन पोषणासंबंधी कायदा, हिंदु उत्तराधिकार कायदा मातृत्वलाभाविषयी कायदा, समान वेतन कायदा, कुटुंब न्यायालय कायदा, मुस्लिम विवाह विच्छेद कायदा, बालविवाह प्रतिबंध कायदा, अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा, उत्तराधिकार कायदे इ. प्रकारचे अनेक कायदे निर्माण करण्यात आले आहेत त्यामुळे महिलांच्या स्थितीमध्ये सुधारणा झाली आहे.[२]

भारतीय संविधानात स्त्री, पुरूष, गरिब, श्रीमंत, शिक्षित, अशिक्षित सर्वाना समान संरक्षण प्रदान केले आहे. स्त्री—पुरूष सर्वांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाचे आश्वासन दिले आहे. भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेत स्त्री—पुरूषांसह सर्वांना समता, स्वातंत्र्य, सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय यांची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रस्तावनेत

''आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकास: सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जा व संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि

© 2024, SK Publisher All Rights Reserved

त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा गांभीर्यपूर्वक निर्धार करून आमच्या संविधानसभेत आज दिनांक २६ नोंव्हेबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.'' हे शब्द भारतीय जनतेच्या सर्वोच्च सार्वभौमत्वाची घोषणा करतात व भारतीय संविधानाचा आधार भारताची सर्व जनता अर्थात स्त्री—पुरूष हे आहेत.[३] यातील 'व्यक्ती' (लोक) हा शब्द भारताच्या सर्व नागरिकांना अर्थात पुरूष व महिलांसाठी वापरण्यात आला आहे. अशाप्रकारे भारतीय संविधान समताधिष्ठीत समाजाचा आधार प्रतिपादीत करते.

संविधान आमच्या देशाचा सर्वोच्च कायदा आहे. या संविधानातील अनेक कलमात महिलांच्या वेगवेगळया अधिकारांची तरतुद आहे त्यातील प्रमुख कलमे खालील प्रमाणेकलम— १४ नुसार राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायदयापुढे समानता अथवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही, या कलमातून स्त्री—पुरूष यांच्यासाठी कायद्यासमोर समता व कायद्याच्या समान संरक्षणाची तरतुद करण्यात आली आहे.

कलम —१५ (१) नुसार राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.

२) केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून नागरिक.

क) दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, हॉटेल आणि सार्वजनिक करमणूकीची साधने यात प्रवेश.

ख) पूर्णत: किंवा अंशत: राज्याच्या पैशाने राखलेल्या अथवा सर्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरिताच खास नेमून दिलेल्या अशा विहिरी, तलाव, स्नानघाट, रस्ते आणि सार्वजनिक राबत्यांच्या जागा यांचा वापर.याविषयी कोणतीही नि:समर्थत:, दायित्व, निर्बंध किंवा शर्त यांच्या अधीन असणार नाही.

३)या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, स्त्रिया व बालके यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतुद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही

४)या अनुच्छेदातील किंवा अनुच्छेद २९ चा खंड (२) यातील कोणत्याही गोष्टीमुळे नागरिकांच्या सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरिता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतुद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही''.[४]

या कलमाने स्त्री—पुरूषांना समान रितीने वागणूक देण्याची तरतुद केली आहे, तसेच महिला व बालकांसाठी विशेष प्रकारची तरतुदही करण्यात आली आहे. महिलांच्या विकासासाठी सरकार यासाठी सकारात्मक कार्यवाही करू शकते.

कलम १६ नुसार सार्वजनिक सेवा योजनाच्या बाबींमध्ये समान संधी.

१)राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील सेवायोजन किंवा नियुक्तीसंबंधीच्या बाबींमध्ये नागरिकांस समान संधी असेल.

२)कोणत्याही नागरिकांस केवळ धर्म, वंश, जात, लिंग,कुळ, जन्मस्थान, निवास या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्याच्या अखत्याराखालील कोणतीही नोकरी किंवा पद यांच्याकरिता अपात्र असणार नाही अथवा त्यांच्या बाबतीत त्याला प्रतिकुल असा भेदभाव केला जाणार नाही.

३)या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, एखादे राज्य किंवा संघ राज्यक्षेत्र यांच्या शासनाचा अथवा यांच्यातील कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या अखत्याराखालील एखाद्या प्रकारचे किंवा अनेक प्रकारचे सेवायोजन किंवा नियुक्ती यांच्या संबंधात अशा सेवा योजनाच्या किंवा नियुक्तीच्या पुर्वी त्या राज्यातील किंवा संघ राज्यक्षेत्रातील निवासाविषयी एखादी आवश्यकता विहित करणार कोणताही कायदा करण्यास संसदेला प्रतिबंध होणार नाही.

४)या अनुच्छेदातील कोणत्याही, गोष्टीमुळे, राज्याच्या सेवांमध्ये नागरिकांपैकी ज्या कोणत्याही मागासवर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधीत्व नाही अशा वर्गाकरिता नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतुद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही. या कलमाच्या अंतर्गत महिला व पुरूष यांना कोणताही भेदभाव न करता सार्वजनिक नियुक्ती व रोजगारासंबंधी समान संधीचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे.[५]

कलम — २३ नुसार माणसाचा अपव्यापार व बिगार यांना मनाई.

१)माणसाचा अपव्यापार आणि बिगार व यासारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे आणि या तरतुदीचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायदयानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

२)सार्वजनिक प्रयोजनाकरिता सेवा करायला लावण्यास राज्याला या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टींमुळे प्रतिबंध होणार नाही व अशी सेवा करावयास लावतांना केवळ धर्म, वंश, जात वा वर्ग या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्य कोणताही भेदभाव करणार नाही. या कलमात 'माणसाचा अपव्यापार' यास प्रतिबंध घातला आहे या कलमाचा मुख्य उद्देश स्त्रियांचे 'देहव्यापारा' पासून संरक्षण करणे हे आहे या दृष्टिकोणातून 'संप्रेषण ऑफ ट्रैफिक इन वुमेन एण्ड गर्ल्स एक्ट १९५६' पास करण्यात आला. या कायद्यात वेश्यावृत्ती करणे, वेश्यागृह चालवणे व देहव्यापाराच्या दृष्टिने लोकांना आकर्षित करणे यासारख्या कार्यांना दंडनीय अपराध बनवले आहे.[६]

संविधानाच्या चौथ्या भागातील मार्गदर्शक तत्वातही महिला अधिकार व संरक्षणासाठी तरतुदी आहेत.

कलम –३९ नुसार

राज्याने अनुसरावयाच्या धोरणाची विवक्षित तत्वे.

राज्य हे विशेषत: पुढील गोष्टी साध्य करण्याच्या दिशेने आपले धोरण आखील.

क)उपजीविकेचे पुरेसे साधन मिळवण्याचा हक्क स्त्री व पुरूष नागरिकांना सारखाच असावा.

ख)सामुहिक हिताला सर्वाधिक उपकारक होईल अशारीतीने समाजाच्या भौतिक साधन संपत्तीचे स्वामित्व व नियत्रंण याची विभागणी व्हावी

ग)आर्थिक यंत्रणा राबविण्याचा परिणाम म्हणून संपत्तीचा व उत्पादन साधनांचा संबंध सामूहिक हितास बाधक होईल अशाप्रकारे एकाच ठिकाणी होऊ नये.

घ)पुरूष व स्त्रिया या दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतन मिळावे.

ड)स्त्री – पुरूष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकाचें कोवळे वय याचा दुरपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पाडु नये.[७]

कलम– ४२ नुसार संविधानातील या कलमानुसार राज्याद्वारे महिलांना प्रसुतीच्या काळात सहाय्यता आणि कामाच्या ठिकाणी मानवीय सुविधा उपलब्ध करण्याची व्यवस्था करेल.

कलम – ४३ नुसार राज्य यथायोग्य विधीविधानाद्वारे किंवा आर्थिक सुसंघटन करून अथवा अन्य कोणत्याही मार्गाने, शेतकी औद्योगिक अथवा अन्य प्रकारच्या सर्व कामगारांना काम, निर्वाह वेतन, समुचित जीवनमान आणि फुरसतीचा आणि सामाजिक व सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपयोग याची शाश्वती देणारी अशी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देण्यासाठी व्यवस्था करील.

कलम – ४१ नुसार स्त्रियांना काम करण्याचा अधिकार, शिक्षण प्राप्त करण्याचा त्याच बरोबर बेरोजगारी, वृध्दावस्था, आजार व विकलांगता या काळात संरक्षण देण्यात आले आहे.[८]

कलम – ४४ नुसार नागरिकांना भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र एकरूप नागरी विधीसंहिता लाभावी यासाठी राज्य प्रयत्नशील राहिल.

४४ वे कलम राज्य भारताच्या सर्व क्षेत्रातील नागरिकांसाठी ज्यात सर्व स्त्री – पुरूषांचा समावेश आहे. त्यासाठी समान नागरी कायदा बनवल्याचा प्रयत्न करेल. ज्यात समान दिवाणी कायदे लागू करण्याची भावना व्यक्त केली आहे.

कलम – ५१ (अ) धार्मिक भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदाच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावणे स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.

कलम – २४३ नुसार ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थात महिलांना ३३ टक्के आरक्षणाची तरतुद करण्यात आली आहे व यातील अध्यक्षांच्या जागासाठीही ३३ टक्के पदाच्या आरक्षणाची व्यवस्था आहे.

कलम –३२५ नुसार संविधानाच्या या कलमानुसार मतदार यादीत महिला व पुरूषांना समान रितीने सहभागी होण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. या कलमानुसार संसदेच्या दोहोंपैकी कोणत्याही सभागृहाच्या अथवा राज्य विधीमंडळाच्या सभागृहाच्या किंवा दोहोंपैकी कोणत्याही सभागृहाच्या निवडणुकीकरिता प्रत्येक क्षेत्रीय मतदारासंघासाठी एक सर्वसाधारण यादी असेल आणि कोणतीही व्यक्ती केवळ धर्म, वंश, जात, लिंग या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून अशा कोणत्याही मतदार संघात समाविष्ट होण्यास अपात्र असणार नाही अथवा या करणास्तव तिला अशा कोणत्याही मतदार संघासाठी असलेल्या कोणत्याही खास मतदार यादीत समाविष्ट केले जाण्याची मागणी करता येणार नाही.[९]

भारतीय संसदेव्दारे महिलांची स्थिती सुधारण्यासाठी, यांच्याविरूध्दचे अत्याचार थांबावेत यासाठी व मानवाधिकार संरक्षणासाठी वेगवेगळया प्रकारचे कायदे अधिनियम पास केले आहेत. ब्रिटीशांनी व स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शासनाने वेगवेगळया कायद्यांची निर्मिती करून स्त्री अधिकाराच्या संरक्षणाचा प्रयत्न झाला. त्यातील प्रमुख कायदे पुढील प्रमाणे १८२९ मध्ये सतीबंदी कायदा, १८५६ चा विधवा पूर्नविवाह कायदा १८६० चा बालविवाह, प्रतिबंधक कायदा, १८९१ च्या कायद्याद्वारे लग्नाचे वय तेरा वर्ष निश्चित करणे, १८२९ च्या शारदा ॲक्टद्वारे जोडप्यातील अंतर निश्चित करणे, १८७२ कोणत्याही धर्मातील व्यक्तीशी विवाहबध्द होणे १८४६ द्विभार्या प्रतिबंधक कायदा, हिन्दू स्त्रियांच्या संपत्तीवर अधिकार अधिनियम १९३७. शरीयत अधिनियम १९३७ अशा प्रकारचे प्रयत्न ब्रिटीश काळात झाले. यानंतर स्वातंत्र्योत्तर काळातही मोठया प्रमाणावर कायदे करण्यात आले.

संदर्भ ग्रंथसूची

1. फडिया, डॉ. बी. एल., अन्तर्राष्ट्रीय राजनीति : सिध्दांत एवं समकालीन राजनीतिक मुद्दे, अन्तर्राष्ट्रीय राजनीती: सिध्दांत एंव समकालीन राजनीनितीक मुद्दे, साहित्य भवन पब्लीकेशन्स, आग्रा—२००७, पृष्ठ क्र. ५२३.
2. http://www.un.org./womanwatch/daw/beijing/beijingdeclaration.html.
3. सिंह, डॉ. निशांत, मानवाधिकार और महिलाएँ, मानवाधिकार और महिलाएँ, राधा पब्लीशिंग, नई दिल्ली, २००८, पृष्ठ क्र. ९१.
4. व्यास, डॉ. मिनाक्षी, नारी चेतना और सामाजिक विधान, रोशनी पब्लीकेशन्स, कानपूर, २००८ पृष्ठ क्र. १६.
5. जोशी, अॅ. विजय नारायण, कायदे—स्त्रिया व मुलांचे हक्क,मुकुंद प्रकाशन, पुणे—२००७ पृष्ठ क्र. ५—६.
6. सिंह, डॉ. निशांत, मानवाधिकार और महिलाएँ, पृष्ठ क्र. ९२—९३.
7. सिंह, डॉ. निशांत, मानवाधिकार और महिलाएँ, पृष्ठ क्र. ९३.
8. शर्मा, संगीता, शर्मा, राजेश कुमार, महिला विकास एवं राजकीय योजना, रितु पब्लीकेशन्स, जयपुर—२००५ पृष्ठ क्र. ४१.
9. शर्मा, संगीता, शर्मा, राजेश कुमार, महिला विकास एवं राजकीय योजना, पृष्ठ क्र. ४५

:::. Cite this article .:::

जोगदंड, प्रा. डॉ. बाळासाहेब जी. (2024). भारतीय संविधान व महिंलाचे मानवाधिकर. SK International Journal of Multidisciplinary Research Hub, 11(12), 564–567. https://doi.org/10.61165/sk.publisher.v11i12.110